प्रेस नोट

स्थानिक गुन्हे शाखा,गडचिरोली　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक ०८.०५.२०२०

| **पो.स्टेशन/अप.क्र./कलम** | **घटनास्थळ/घटना ता.वेळ** | **फिर्यादी व आरोपीतांचे नाव** |
|---|---|---|
| गडचिरोलीअप. क्र. १६७/०२०कलम ४,५ महा. जुगार प्रति. अधि.<br>. | मौजा आशीर्वाद नगर गडचिरोली २ किमी पश्चिम पो.स्टे गडचिरोली<br>**घटना ता. वेळ :-**<br>दिनांक ०७.०५.२०२० चे १९.१५ ते २३.०वा.पर्यत | सरकार तर्फे :- पोलीस निरीक्षक उल्हास पी. भुसारी नेम. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्या. गडचिरोली<br>**आरोपीतांचे नाव :-** १) सुभाष समय्या उप्पलवार वय २७ वर्षे, रा. आशीर्वाद नगर, गडचिरोली<br>२) मिथुन महेंद्र रणदिवे वय ३६ वर्षे रा. आशीर्वाद नगर, गडचिरोली<br>३) अमीत प्रदिप इंदुरकर वय २८ वर्षे रा. आशीर्वाद नगर, गडचिरोली<br>४) रामसरेक विश्राम यादव वय ३३ वषे रा. कॅम्प एरीया रामपुरीवार्ड गडचिरोली<br>५) अथर्व लक्ष्मण कासर्लावार वय २५ वर्षे रा. कॅम्प एरीया रामपुरी वार्ड गडचिरोली<br>६) योगेश महेंद्र रणदिवे वय ३२ वर्षे रा. आशीर्वाद नगर गडचिरोली<br>७) प्रविण प्रमोद रक्षमवार वय ३२ वर्षे, रा. आशीर्वाद नगर गडचिरोली<br>८) दिनेश नामदेव भगत वय ४५ वर्षे रा. आयटीआय चौक गडचिरोली<br>९) कपील गजानन चावके वय ३२ वर्षे रा. बसेरा कॉलनी गडचिरोली<br>१०) विजय ज्ञानेश्वर वागुलकर वय ३० वर्ष रा. आशीर्वाद नगर गडचिरोली<br>११) जगदिश रामचंद्र डोंबळे वय ३० वर्षे रा. महिला कॉलेज मागे विसापुर रोड गडचिरोली |

| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैध जुगार रेड मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** |
|---|---|
| गोपनिय बातमीदारा कडुन मिळालेल्या माहिती वरुन | पोलीस निरीक्षक उल्हास पी भुसारी, पोलीस निरीक्षक प्रदिप व्ही. चौगावकर, पोहवा/ कुलदिप गौरकर पोस्टे गडचिरोली तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील कार्यरत सपोनि विक्रांत सगणे, पोउपनि भागवत कदम, सफौ/गंगाधर भोयर, सफौ/दादाजी करकाडे, पोहवा/भाऊराव बोरकर, पोशि/मंगेश राऊत, पोशि/ मानीक दुधबळे, पोशि/सुनील पुट्टावार, चापोना/मानीक निसार, मपोशि/पुष्पा कन्नाके, पोशि/ पंकज भगत |

गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु विक्री तसेच इतर अवैध व्यवसायांवर अंकुश बसावा याकरीता मा. श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु, जुगार व इतर अवैध व्यवयांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशिर कारवाई करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

दिनांक ०७.०५.२०२० रोजी पोलीस निरीक्षक उल्हास पी. भुसारी स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली येथे कार्यालयात हजर असतांना गोपनिय सुत्राकडुन जुगारा संबधात मिळालेल्या माहितीचे आधारे पोलीस निरीक्षक उल्हास पी. भुसारी हे स्वतः सोबतचे पोलीस पथक व दोन स्थानिक पंचासह नियंत्रण कक्ष गडचिरोली येथे स्टे.डा. नोंद क्रमांक २५/२०२० चे १८.५० वाजता नियोजनप्रमाणे मिळालेल्या माहितीचे आधारे जुगार रेड कामाने रवाना होवुन मिळालेल्या माहिती प्रमाणे प्रविण प्रमोद रक्षमवार रा. आशीर्वाद याचे घरी पोहचुन अवैध जुगाराचे डावावर छापा घातला असता नमुद घरमालकसह अन्य १० इसम ५२ ताश पत्यांवर पैशाची बाजी लावुन हारजीतीचा जुगार खेळत असतांना मिळुन आल्याने त्यांना कायदेशिर ताब्यात घेवुन घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार करण्यात आला.

घटनास्थळ पंचनामा कार्यवाही दरम्यान सदरचे घटनास्थळी जुगाराचे डावावर लावण्यात आलेली एकुन १६,१२०/- रुपये रोख रक्कम तसेच जुगार खेळणाऱ्या वरील नमुद ११ इसमांकडे जुगाराचे डावात वापरण्याकरीता ताब्यात ठेवुन असलेली एकुन १,२९,५००/- रुपये रोख रक्कम असे एकुन १,४५,६२०/- रुपये नगदी, घटनास्थळी मिळुन आलेली चार वाहने (मोटार सायकल/दुचाकी) किमंत १,६०,०००/- रुपये किमंतीचे, जुगाराचे घटनास्थळी मिळुन आलेले एकुन १२ मोबाईल अंदाजे २,२७,०००/- रुपये किमंतीचे, जुगाराचे डावातील वापरते एकुन ११५/- रुपये किमंतीचे इतर साहित्य अशा प्रकारे एकुन ५,३२,७३५/- रुपये किमंतीचा मुद्देमाल अशा प्रकारे जुगाराचे डावात वापरण्यात आलेले वरील नमुद साहित्य, रोख रक्कम, मोबाईल, मोटार सायकल पंचासमक्ष घटनास्थळावरुन जप्त करण्यात आले

घरमालक आरोपी नामे प्रविन प्रमोद रक्षमवार याने त्याचे राहाते घर जुगाराकरीता खोली उपलब्ध करुन देवुन जुगार खेळण्याकरीता आलेल्या इसमांना मुलभुत सुविधा उपलब्ध करुन दिल्यात तसेच सदर ठिकाणी त्याचे सह वरील नमुद इतर १० ईसम ५२ ताश पत्यांचा हारजीतीचा पैशाचा जुगाराचा डाव लावुन खेळत असल्याने सदरचे कृत्य महाराष्ट्र जुगार कायदा चे कलम ४,५ अन्वये दंडनिय असल्याने जप्त मुद्देमालसह आरोपीतांना ताब्यात घेवुन पुढील कार्यवाहीस्तव पोलीस स्टेशन गडचिरोली येथे हजर होवुन त्यांचे विरुध्द गुन्हा नोंद होणेस दिलेल्या लेखी फिर्याद वरुन पोलीस स्टेशन गडचिरोली येथे कायदेशिर कारवाई करण्यात आली आहे.

